| | |
|---|---|
| MHPU120002882020 | **नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०२० मधील नि.क्र.४०**<br>**वरील आदेश**<br>श्रीमती सुभद्राबाई शिवाजी तरस व इतर विरुध्द<br>अमर किरण भालघरे व इतर |

प्रतिवादी क्र.१७ ते २० यांनी नि.३६ वर त्यांच्याविरुध्द झालेला म्हणणे नाही असा आदेश रद्दबातल करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे बाहेरगावी असल्याने त्यांना त्यांचे म्हणणे देता आले नाही. सदरचा आदेश रद्दबातल न झाल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** वादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल करुन योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केलेली आहे.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादींविरुध्द म्हणणे नाही असा आदेश नि.३६ वर दि.३१.०१.२०२६ रोजी पारित करण्यात आलेला आहे. नि.३६ वरील अर्ज हा वादी यांनी मयत प्रतिवादींचे वारस अभिलेखावर न घेण्यासंदर्भात परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे स्वरुप विचारात घेता सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे घेणे उचित होईल. त्याकरीता सदर आदेश रद्दबातल करणे आवश्यक आहे. प्रतिवादींचे म्हणणे दाखल करुन घेतल्यास वादी यांना कोणतीही तोषिश लागत नाही. याउलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली होण्यास मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी यांचा अर्ज नि.४० मंजुर करण्यात येतो.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.03.13 17:28:51 +0530

**ठिकाण – भोर** **( एस.डी.शिरसाट )**

**दिनांक – १३.०३.२०२६.** **०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**